Since 1917

॥ सकल जनांसी आधारु ॥

**THE KARAD URBAN CO-OPERATIVE BANK LTD., KARAD**

(SCHEDULED BANK)

Centenary Celebrated Bank

REF. NO. **HO/MARKETING/2021-22/** 270 DATE : 20 APR 2021

# – कार्यालयीन आदेश –

**विषय: शासन निर्देशानुसार सर्व शाखांच्या कामकाज वेळेतील बदलाबाबत.**

कोव्हिड-१९ या महामारीमुळे माहे एप्रिल-२०२१ मध्ये रूग्णसंख्या व महामारीच्या वाढलेल्या तीव्रतेमुळे मा. जिल्हाधिकारी, सातारा यांच्या दि.१९ एप्रिल २०२१ रोजीच्या सुधारित आदेशानुसार बुधवार दि.२०.०४.२०२१ पासून शाखा व मुख्यकार्यालयाची कामकाज वेळ खालीलप्रमाणे राहील ;

| अ. | शाखा | कॅश कामकाजाची वेळ | अंतर्गत कामकाजाची वेळ | Day Mark करण्याची वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | सर्व शाखा<br>सेवकांसाठी स.९ ते दु. २ | सकाळी ९.१५ ते दुपारी १२.३० पर्यंत | दुपारी १२.३० ते दुपारी २ पर्यंत | सर्व शाखांनी Day Mark दु.१.३० पूर्वी करण्याचा आहे. |
| २ | मुख्यकार्यालय | स.९ ते दु.२ पर्यंत | | |

शासनाच्या आदेशानुसार वरील नमूद वेळेनुसार कामकाज करणेचे आहे व शाखा कामकाज वेळेनंतर शाखा बंद ठेवण्याची आहे. शाखेतील सर्व सेवक तसेच ग्राहकांनी मास्कचा व सॅनिटायझरचा वापर करून सामाजिक अंतर ठेवणे अनिवार्य आहे.

वरील कालावधीमध्ये शासन / स्थानिक प्रशासकीय अधिकारी (Incident Commander) यांनी दिलेल्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे व त्यानुसार शाखेच्या कॅश व अंतर्गत कामकाजाचे नियोजन करावे. प्रशासकीय अधिकारी (Incident Commander) यांच्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन होऊन दंडात्मक कारवाई होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी. तसेच कोव्हीड-१९ च्या अनुषंगाने खालील महत्वाच्या सूचनांचे पालन करावे.

मुख्य कार्यकारी अधिकारी

*** कोव्हीड–१९ च्या अनुषंगाने महत्वाच्या सूचना ***

१. शाखेमध्ये एकावेळी चार (४) पेक्षा अधिक ग्राहकांना प्रवेश दिला जावू नये.

२. शाखेमध्ये सर्वांनी मास्कचा वापर करणे बंधनकारक आहे.

३. शाखेत प्रवेश करणेपूर्वी सुरक्षारक्षक अथवा शिपाई यांनी ग्राहकांचे डिजीटल इन्फ्रारेड थर्मामीटरद्वारे तापमानाची तपासणी करून घ्यावी तसेच ग्राहकांनी प्रवेशद्वारावरील फूट सॅनिटायझर स्टँडचा वापर करून हात सॅनिटाईझ केल्यानंतरच त्यांना शाखेत प्रवेश द्यावा. 99F° पेक्षा अधिक तापमान आढळल्यास अगर मास्क नसल्यास त्या ग्राहकास शाखेत प्रवेश देवू नये.

४. ग्राहकांना काऊंटरवरती सोशल डिस्टन्सिंगचे पालन करून विनाकारण गर्दी न करणेबाबत तसेच कामाव्यतिरिक्त जास्त वेळ शाखेत न थांबणेबाबत सूचना कराव्यात. **शाखा आठवड्यातून एकदा सॅनिटाईझ (निर्जंतूक) करून घ्यावी.**



Scanned by TapScanner